दिनांक.१४/०९/२०१८

# प्रेसनोट

## युट्युबवर व्हीडीओ बघून गाड्या चोरी करणारा अटकेत

## भारती विद्यापिठ पोलिस ठाणेची कामगिरी

दि.१२/०९/२०१८ रोजी **भारती विद्यापिठ पोलीस ठाणे** हददीत वाहन चोरीच्या व घरफोडी गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड व कर्मचारी पेट्रोलींग करीत असताना **पोलिस कर्मचारी उज्वल मोकाशी व शिवा गायकवाड** यांना माहीती मिळाली की, एक इसम गुजरवाडी फाटा येथे थांबलेला असुन त्यांने सुमारे १ आठवडयापुर्वी रात्रीच्या वेळी होंडा शाईन मोटार सायकल चोरी केलेली आहे. अशी माहीती मिळाल्याचे पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड यांना कळविलेनंतर लागलीच त्यांनी सदरची बातमी मा वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविली असता त्यांनी खात्री करुन योग्य ती कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केलेनंतर लागलीच आम्ही स्टाफ, असे खाजगी वाहनाने रवाना होवुन गुजरवाडी फाट्या जवळ जावुन वॉच केला असता बातमीतील इसम संशयीत रित्या वावरत असताना दिसलेने त्यांस हटकले असता तो पळुन जाणेचा प्रयत्न करु लागल्याने त्यांस स्टाफचे मदतीने १९.१० पकडुन त्यांस आहे त्या स्थितीत ठेवुन त्यांस त्याचा नाव पत्ता विचारता त्यांने त्याचा नाव पत्ता **१)आकाश मोतीलाल कोटवाल वय-२० वर्ष रा.सध्या खोपडेनगर गुजर निंबाळकरवाडी रोड कात्रज पुणे मुळ रा.चारणेरवाडी ता.सिल्लोड जि.औरंगाबाद** अशी असल्याचे सांगितले. नंतर त्यांस पोलीस ठाणे येथे त्यांना विश्वासात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता तपासादरम्यान त्याचेकडून **एकुण ३ मोटार सायकल व दोन लॅपटॉप कि.रू.१,७०,०००/- चा माल जप्त** करण्यात आला आहे.

वरील आरोपीकडून भारती विद्यापिठ पोलिस स्टेशन कडील २,व शिक्रापुर पोलीस ठाणे, लोणी काळभोर (पुणे ग्रामिण) पोलीस ठाणे कडील प्रत्येकी १ असे एकुण ४ गुन्हे उघडकीस आले आहेत.त्याचा अधिक तपास चालु असून सदरचा आरोपी हा **युट्युबवर व्हीडीओ बघून गाड्या चोरी करत असल्याचे** सांगत असून त्याने १२ वी नंतर मॅकेनिकलचे शिक्षण केले आहे.त्याचेवर बीड व औरंगाबाद येथे वाहनचोरीचे व दरोड्याचा प्रयत्न असे गुन्हे दाखल आहेत.अधिक तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.रविंद्र रसाळ सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विष्णू पवार सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. शिवदास गायकवाड, सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवलदार विनोद भंडलकर,श्रीधर पाटील,गणेश सुतार,प्रणव सकपाळ,उज्वल मोकाशी, शिवा गायकवाड,समीर बागसिराज,दत्तात्रय पवार,सुमित मोघे,जगदीश खेडकर यांचे पथकाने केलेली आहे.**